# सुविचार

यद्यपि आप समय को परिवर्तन नहीं कर सकते, किन्तु यह महसूस अवश्यक करें कि परिवर्तन का समय अब है।


विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र

दैनिक **यशवंत**

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/ शुक्रवार दि. १४ जून २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१२५ ✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦


# पूर्ण क्षमतेने प्रत्युत्तर द्या

## जम्मू-काश्मीर दहशतवादी हल्ल्यानंतर पंतप्रधान मोदींची उच्चस्तरीय बैठक




नवी दिल्ली : काश्मीर खो-यामध्ये गेल्या काही दिवसांपासून दहशतवाद्यांनी डोके वर काढण्यास सुरुवात केली आहे. काही दिवसांपूर्वी शिवखोडीला जाणा-या बसवर दहशतवाद्यांनी गोळीबार केला होता, ज्यात १० जणांचा मृत्यू झाला होता. हा भाग इतरांच्या तुलनेत सुरक्षित मानला जात होता आणि तिथे दहशतवादी हल्ल्याच्या घटना देखील घडत नव्हत्या. मात्र या घटनेनंतर चित्र बदलले आणि सुरक्षा दलाने या भागात शोध मोहिम अधिक तीव्र केली. ही घटना ताजी असतानाच दहशतवादी हल्ल्याच्या आणखी चार घटनांनी जम्मू काश्मीर हादरले आहे. या घटनानंतर आता केंद्र सरकारने तिथल्या परिस्थितीचा आढावा घेण्यास सुरुवात केली. पंतप्रधानांनी जम्मू-काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांच्याशीही बोलून तिथल्या परिस्थितीचा आढावा घेतला.

गेल्या काही दिवसांत जम्मू-काश्मीरमध्ये अनेक दहशतवादी हल्ले झाले आहेत. गेल्या चार दिवसांत रियासी, कठुआ आणि डोडा जिल्ह्यात दहशतवाद्यांनी चार ठिकाणी हल्ले केले असून त्यात नऊ यात्रेकरू आणि एक सीआरपीएफ जवान ठार झाला आहे. सात सुरक्षा कर्मचारी आणि अनेक जण जखमी झाले. त्यानंतर **(पान ३ वर)**

# सुनेत्रा पवार राज्यसभेवर बिनविरोध निवड

मुंबई : उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांची राज्यसभेवर बिनविरोध निवड झाली आहे. आज दुपारी ३ वाजेपर्यंत राज्यसभेसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत होती मात्र दुपारी ३ पर्यंत राज्यसभेसाठी कोणीही उमेदवारी अर्ज दाखल न केल्याने सुनेत्रा पवार यांची राज्यसभेवर बिनविरोध निवड झाली आहे.



आज राष्ट्रवादी काँग्रेसकडून (अजित पवार गट) अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी मुंबईतील विधानभवनात राज्यसभेसाठी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह खासदार प्रफुल्ल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे, मंत्री छगन भुजबळ, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवळ उपस्थित होते. उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर सुनेत्रा पवार यांनी माध्यमांशी संवाद साधत राष्ट्रवादी काँग्रेसकडून मला राज्यसभेसाठी उमेदवारी देण्यात आली आहे. याबद्दल मी पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांचा आभार मानते. त्यांनी माझ्यावर जो विश्र्वास दाखवला आहे त्या संधीचे मी सोनं करेन **(पान ३ वर)**

# एसटी महामंडळातील बदल्या ऑनलाईन पद्धतीने होणार

मुंबई :- राज्य महामार्ग परिवहन महामंडळ अर्थात एसटी महामंडळामध्ये काम करणा-या चालक-वाहकांपासून अधिका-यांपर्यंत सर्वांच्या विनंती बदल्या यापुढे संगणकीय प्रणालीव्दारे ऑनलाईन पध्दतीने होणार आहेत. त्यामुळे बदल्यांबाबतचे विविध आक्षेप कमी होणार असून सेवा जेष्ठतेनुसार सर्व कर्मचा-यांना समान न्यायाची हमी या नव्या पध्दतीने शक्य होणार आहे.

एसटी महामंडळामध्ये चालक-वाहकापासून अधिका-यांपर्यंत सुमारे ८७ हजार कर्मचारी सध्या कार्यरत आहेत. एक मध्यवर्ती कार्यालय, सहा प्रदेश, त्या प्रदेशांतर्गत ३१ विभाग आणि या विभागांतर्गत कार्यरत असलेले २५१ आगार आहेत. या बरोबरच तीन मध्यवर्ती कार्यशाळा, ९ टायर पुनस्त:रण प्रकल्प आणि एक मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था असा एसटी महामंडळाचा अवाढव्य पसारा आहे. या सर्व आस्थापनांमध्ये काम करणारे कर्मचारी गंभीर आजारपण, पती-पत्नी एकत्रीकरण, आपापसातील बदली अशा अनेक कारणास्तव विनंती बदलीचे अर्ज त्यांच्या कार्यालयीन प्रमुखांकडे सादर करतात. परंतु विविध प्रकारच्या हस्तक्षेपामुळे, बदल्यांमध्ये अनियमितता होत असते. परिणामी, कर्मचा-यांना न्याय ऐमिळत नाही. सेवा जेष्ठतेनुसार सर्व कर्मचा-यांना समान न्याय मिळण्याच्या हेतूने महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर यांच्या विशेष पुढाकाराने बदल्या संदर्भातील संगणकीय प्रणालीव्दारे ॲप एसटी महामंडळाकडून विकसीत करण्यात येत आहे.

तीन पर्याय देण्याची मुभा या ॲपव्दारे विभागांतर्गत एका आगारातून दुस-या आगारात, प्रदेशांतर्गत एका ऐविभागातून दुस-या विभागात विभागात आणि राज्यात एका प्रदेशातून दुस-या प्रदेशात विनंती बदलीचे (एकाच पदात १ वर्ष पुर्ण झालेल्या कर्मचा-यांचे) अर्ज भरून घेण्यात आले आहेत. **(पान ३ वर)**

# लातुर काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन




लातूर प्रतिनिधी - लातूर लोकसभा मतदार संघासह लातूर जिल्हयातील शेतकऱ्यांसाठी खरीप हंगाम महत्वाचा आहे. यावर्षी पाऊस वेळेवर पडल्याने सर्व शेतकरी पेरणीच्या कामात व्यस्त आहेत. खरीपासाठी शेतकऱ्यांना चांगले खत व बियाणे मिळावीत, बोगस बियाणे आणि खते रोखून शेतकऱ्यांना आवश्यक दर्जेदार बियाणे आणि खतांची उपलब्धता करावी, खरीपातील सोयाबीन आणि इतर पिकावरील शंखी गोगलगाय, पिवळा मोझॅक आणि तुरीवरील मर रोग यांच्या नियंत्रणासाठी प्रतिबंधात्मक उपाय करावेत, तसेच गतवर्षीच्या खरीप हंगामातील पिकवीमा शेतकऱ्यांना देण्यात यावा या मागणीचे निवेदन लातूर लोकसभेचे खासदार शिवाजी बंडाप्पा काळगे यांच्या नेतृत्वाखाली लातुर काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर - घुगे यांना देण्यात आले.

खरीप हंगाम सुरु होत असतांना शेतकऱ्याकडून खते बियाणेचा दर्जा, उपलब्धता या बाबत तक्रारी येऊ लागल्या. पेरणी सुरू असतांनाच खरीपातील सोयाबीन आणि इतर पिकावरील शंखी गोगलगाय, पिवळा मोझॅक आणि तुरीवरील मर रोग नियंत्रणासाठी उपायाची आवश्यकता दिसू लागली. तसेच गतवर्षीच्या खरीप हंगामातील पिकवीमा शेतकऱ्यांना अदयाप मिळाला नाही. याअनुषंगाने सहकार महर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख, राज्याचे माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख, लातूर ग्रामीणचे आमदार धीरज विलासराव देशमुख यांनी सदरील **(पान ३ वर)**

# जिल्हाधिकारी पेरणीसाठी शेतकऱ्यांच्या बांधावर पोहचतात तेव्हा

लातूर / प्रतिनिधी- जिल्ह्यात यंदा मॉन्सूनच्या सुरुवातीलाच मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने शेतकऱ्यांची पेरणीसाठी लगबग सुरु झाली आहे. पावसाने काहीशी उघडीप दिल्यानंतर सुरु झालेल्या पेरणीची पाहणी करण्यासाठी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे थेट शेतकऱ्यांच्या बांधावर पोहचल्या. शेतकऱ्यांशी संवाद साधून बियाणांची उपलब्धता, खतांचा वापर आणि पेरणीची पद्धती याबाबत माहिती घेतली. यावेळी स्वतः टोकन यंत्र हाती घेवून पेरणीचा अनुभवही त्यांनी घेतला. तसेच बैलजोडीच्या सहाय्याने होत असलेल्या पारंपारिक पेरणीचाही त्यांनी अनुभव घेतला.



औसा तालुक्यातील लामजना, तांबरवाडी आणि खारोसा या गावांना भेट देवून जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी पेरणीची पाहणी केली. कृषि विभागामार्फत पेरणीविषयी जनजागृती करण्यात आली असून प्रत्यक्ष पेरणी प्रसंगी शेतकऱ्यांकडून बीजप्रक्रिया, आधुनिक पद्धतीने मोठ्या प्रमाणात पेरणी होत असल्याबद्दल जिल्हाधिकारी यांनी समाधान व्यक्त केले. तसेच यंदा चांगला पाऊस होवून शेतकऱ्यांना भरघोस उत्पन्न मिळावे, अशा शुभेच्छा त्यांनी व्यक्त केल्या. **(पान ३ वर)**




दैनिक
यशवंत
शुक्रवार दि.१४ जुन २०२४
२
अहमदपूर/चाकूर परिसर
E-mail :- yashahmedpur@gmail.com संपर्क मो.९८५०२७३०४७, ९८२३१११९०७

# माकणी येथील सरपंचचा सह शेकडो महिला व पुरुषांचा उत्तमराव वाघ प्रतिष्ठान मध्ये जाहीर प्रवेश



अहमदपूर दि.१३(कारामुंगीकर) माकणी येथील सरपंचचा सह शेकडो महिला व पुरुषांचा उत्तमराव वाघ प्रतिष्ठान मध्ये जाहीर प्रवेश केला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, अहमदपूर चाकूर विधानसभेचे नेते तथा उत्तमराव वाघ प्रतिष्ठानचे संस्थापक उत्तमराव वाघ यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून अहमदपूर तालुक्यातील माकणी येथील शेकडो महिला व पुरुषांनी उत्तमराव वाघ प्रतिष्ठानमध्ये हणमंतवाडी येथील संपर्क कार्यालयात आज जाहीर प्रवेश केला.

याप्रसंगी उत्तमराव वाघ यांनी माकणी येथील महिला व पुरुषांना उत्तमराव वाघ प्रतिष्ठानमध्ये प्रवेश देऊन त्यांचे स्वागत केले.

प्रवेश केलेल्या सर्व महिला व पुरुष कार्यकर्त्यांना उत्तमराव वाघ यांनी आगामी कार्यासाठी शुभेच्छा देऊन भविष्यात असेच सर्वांचे प्रेम माझ्या पाठीशी असावेत अशी सदिच्छा व्यक्त केली.

याप्रसंगी *सरपंच मुद्रिकाबाई कांबळे,शालेय समितीचे अध्यक्ष सत्यवान कांबळे, आशुतोष कांबळे, प्रताप कांबळे, लखन कांबळे, प्रवीण कांबळे, दिगंबर गायकवाड, ऋतुराज कांबळे, अच्युत कांबळे, अविनाश कांबळे, तानाजी कांबळे यांच्यासह दगडूबाई कांबळे, उषा कांबळे, लवंगाबाई सोनकांबळे, सागर कांबळे, चौत्राबाई कांबळे, शामल कांबळे, विजयमाला कांबळे, प्रवीण कांबळे, दिगंबर गायकवाड, ऋतुराज कांबळे, अच्युत कांबळे संगीता कांबळे, स्वाती बनसोडे,शीला कांबळे* आदींनी उत्तमराव वाघ प्रतिष्ठान मध्ये प्रवेश केला.


याप्रसंगी प्रेमाताई कांबळे यांच्यासह उत्तमराव वाघ प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**संकल्प आणि कधीही न संपणारा संघर्ष म्हणजे जीवन**

# विद्यापीठीय परीक्षेत महात्मा फुले महाविद्यालयाच्या मुलींच अव्वल

## कु . शेख नगमा प्रथम, कु. पठाण नूरजहा व्दितीय तर कु .जाधव शालू तृतीय







अहमदपूर दि.१३(कारामुंगीकर) येथील महात्मा फुले महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी नुकत्याच जाहिर झालेल्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या उन्हाळी २०२४ या परीक्षेत बी. ए. विद्या शाखेत विशेष गुणवत्ता प्राप्त करीत उत्तुंग भरारी घेवुन मुलांना मागे टाकुन मुली अव्वल आल्या आहेत. त्यात कु . शेख नगमा प्रथम, कु. पठाण नूरजहा व्दितीय तर कु .जाधव शालू तृतिय आली आहे.

याबाबतचे सविस्तर वृत्त असे की, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांच्या कुशल नेतृत्वाखाली २००९ पासून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात गुणवत्ते सह विविध क्षेत्रात फुले पॅटर्न निर्माण केला असून उच्च शिक्षणात ज्ञान पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अहमदपूरला महात्मा फुले महाविद्यालयाने गतवैभव प्राप्त करून दिले आहे.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने घेतलेल्या उन्हाळी २०२४ परीक्षेत महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु . शेख नगमा खलील हिने ८८ % टक्के गुण प्राप्त करून महाविद्यालयातून प्रथम येण्याचा मान पाठविला तर, कु. पठाण नूरजहॉ शौकत या विद्यार्थिनींनी ८७.८०% गुण घेऊन सर्व द्वितीय तर कु .जाधव शालू भीमा या विद्यार्थिनीने ८६.५५% गुण घेऊन सर्व तृतीय येण्याचा मान पाठविला आहे. बी.ए.तृतीय वर्षाचा एकूण निकाल ८४.४४% लागला असून ३१ विद्यार्थी विशेष प्राविण्य श्रेणीत तर ७विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. तसेच बी.ए.द्वितीय वर्षातून कु .गिरी अश्विनी अच्युत ही विद्यार्थी ७६. ६२ %सर्वप्रथम तर कु. कुरिल नेहा संजय ७४. ५७% सर्व द्वितीय व कु. दराडे प्रतीक्षा शिवाजी ही विद्यार्थी ७४. ४३% घेऊन सर्व तृतीया आली आहे. बी.ए. द्वितीय वर्षाचा एकूण निकाल ९७.२९% टक्के लागला असून पाच विद्यार्थी विशेष प्राविण्य श्रेणीत तर दहा विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. तसेच बी.ए. प्रथम वर्षतून कु . पटवारी दुर्गा लालचंद ८५.२४ % सर्वप्रथम, कु. भदाडे ऐश्वर्या अंतराम ८०.५० % सर्व द्वितीय तर गुळवे दिव्या माधव ७७.५४ % घेऊन सर्व तृतीय आली असून, बी.ए. प्रथम वर्षाचा एकूण निकाल ८८.६३% एवढा लागला आहे तर १७ विद्यार्थी विशेष प्राविण्य श्रेणी व १६ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.

या गुणवंत विद्यार्थ्यांच्या पालकांसह इतर चांगली टक्केवारी घेणा-या पालकांनी आपण आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी महात्मा फुले महाविद्यालय हे योग्य असलेल्या महाविद्यालयाची निवड केली त्याचे समाधान असल्याच्या आग्रही प्रतिक्रिया महाविद्यालयाकडे दिल्या आहेत.

सर्व गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांचे किसान शिक्षण प्रसारक मंडळ उदगीरचे अध्यक्ष श्रीरंगराव पाटील एकंबेकर, उपाध्यक्ष माधवराव पाटील, सचिव पी.टी. शिंदे यांच्यासह मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी तसेच महाविद्यालयातील महाविद्यालय विकास समितीच्या सर्व सदस्यांनी व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील, उपप्राचार्य डॉ. दुर्गादास चौधरी यांच्यासह श्रेयाचे खरे मानकरी असलेल्या सर्व प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

**टी.सी. हरवली आहे**

**सिद्धेश्वर तुकाराम सुरवसे या** नावाची **श्री त्रिपुरा कनिष्ठ महाविद्यालय, लातुर** जिल्हा लातूर येथील १२ वी विज्ञान पासची टी. सी. लातूर **ते अहमदपूर** प्रवासादरम्यान हरवली आहे.

सदरील टी.सी. कोणास सापडल्यास खालील मोबाईलवर संपर्क करावा.

मो. नंबर- ९६३७६६४०२१

# महाराणा प्रताप यांची जयंती उत्साहात साजरी




अहमदपूर दि.१३(कारामुंगीकर) येथील महात्मा फुले महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व सांस्कृतिक विभागाच्या वतीने मेवाड चे राजे महाराणा प्रताप यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

याबाबतचे सविस्तर वृत्त असे की, मराठी साहित्याचे साहित्यिक तथा समीक्षक ज्येष्ठ शिक्षण तज्ज्ञ, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या महाराणा प्रताप जयंती कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रो. डॉ. अनिल मुंढे हे होते तर, प्रत्युष चिलगर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांच्या हस्ते महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रो. डॉ. अनिल मुंढे यांनी महाराणा प्रताप यांचे तत्कालीन काळातील कार्याचा आढावा घेतांना म्हणाले की, महाराणा प्रताप यांनी विदेशी शक्तींना रोखण्यासाठी इतर भारतीय राज्यांची मदत घेऊन त्यांच्याशी लढा दिला. त्यांच्यामध्ये राष्ट्र अभिमान मोठ्या प्रमाणात दिसून येतो, असेही ते म्हणाले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. पांडुरंग चिलगर यांनी केले तर आभार अजय मुरमुरे यांनी मानले. यावेळी शिवाजी चोपडे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते.

# पाल्याना त्यांचे करिअर निवडण्याचे स्वातंत्र पालकानी द्यावे-आ. बाबासाहेब पाटील

अहमदपूर दि.१३(प्रतिनिधी) प आपल्या पाल्यांना कोणत्या क्षेत्रात रिअर करायचे आहे याची चाचपणी सुरु असून प्रवेश घेण्याची लगबग सुर आहे. है करत असताना सर्व पालकांनी आपल्या पाल्याच्या अंगी एक विशेष गुण आहे, त्याची आवड कशात आहे याचा विचार नक्की करावा. पाल्यावर तुमच्या अपेक्षा लादु नका, त्यांना करिअर निवडण्याचे स्वातंत्र द्या असे प्रतिपादन अहमदपूर- मतदार संघाचे आमदार बाबासाहेब पाटील यांनी केले.

ते चापोली येथील संजीवनी महाविद्यालय व डॉ. नारायणरावचाटे कॉलेज ऑफ फार्मसी चापोली येथे स्व. डॉ. नारायणराव चाटे यांच्या जयंतीनिमित्त. आयोजित विविध कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना बोलत होते.

सदरील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष विश्वनाथ शेटकर है उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी राज्यमंत्री बाव्मसाहेब जाधव, संस्था सचिव तथा चापोलीचे लोकनियुक्त सरपंच डॉ. भालचंद्र चाटे, डॉ. रामराव दुडीले, काशिनाथ गंगापुरे, मल्लिकार्जुन स्वामी, व्यंकटराव होनराव, रामचद्र तिरुके, बब्रुवान आवस्कर, भगवान सोमवंशी, माजी जिल्हा परिषद सदस्य डॉ. पुंडलिक चाटे, आनंदवाडीचे सरपंच संदीप बाचपल्ले, अजनसोंडचे सरपंच देविदास माने, माजी चेअरमन सारोती होनराब, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष प्रभाकर होनराव, गंगाप्रसाद मद्रेवार, रामेश्रूवर होनराव, नाथा मद्रेवार, ग्रामपंचायत सदस्य गणेश स्वामी, स्वामी विवेकानंद विद्यालयाचे मुख्याध्यापक व्यंकटेश शिंदे, प्रा अ. न. शिंदे, डॉ. नारायणराव चाटे कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. सचिन घोव्घवे सह आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना आ. बाबासाहेब पाटील म्हणाले की, डॉ. नारायणराव चाटे दादांनी संजीवनी विद्यालय, महाविद्यालय चापोलीमध्ये सुरु करून परिसरातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली. चापोलीच्या विकासात डॉ. नारायणराव चाटे दादांच्या या शिक्षण संस्थेचा सिहांचा वाटा आहे. संजीवनी शिक्षण संस्थेमुळे चापोलीत विविध रोजगार निर्माण झाले य पिकास होत आहे. दादांसोबत मी राजकारणात जिल्हा परिषदमध्ये काम केले आहे. त्यांची इतरांना मदत करण्याची प्रवृत्ती मी जवव्दून पाहिली आहे.

संजीवनी महाविद्यालयातील दहावी, बारावी व नीट परीक्षेत पात्र ठरलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा याप्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

डॉ. नारायणराव चाटे यांच्या जयंतीनिमित्त संजीवनी महाविद्यलयात रक्तदान शिबीर संपन्न झाले. तसेचवातविकार. श्रवास विकार, पोटाचे विकार, स्त्रियांचे विकार, त्वचा विकार, दातांचे विकार, जीवन शैलीजन्य आजार मधुमेह, . हदयरोग, वंध्यत्व तथा लैंगिक समस्या,मुत्र विकार, हार्निया, अपेंडिक्स,अंडकोश वृद्धी, नाक-कान-घसाविकार या आजारासाठी आलेल्या ३५२ रुग्णांची तपासणी करून उपचार है यावेळी करण्यात आली तसेच परिसरातील गरजूंनी नेत्र तपासणी शिबिराचाही लाभ घेतला. या मोफतशिबिरासाठी उदगीर येथील धन्वंतरी आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्ता पाटील, डॉ. राजेंद्र घाटे, डॉ.मंगेश मुंढे, डॉ. पुष्पा गवब्ळे, डॉ.प्रशांत बिरादार, डॉ. स्नेहल पाटील,डॉ. प्राजक जगताप, डॉ. गुरुराजवरनाके, डॉ. नगम्नता कोरे, डॉ. शिवकुमार होटूछकर व डॉ. अमोल पाटील हे तज्ञ डॉक्टर उपस्थित राहून तपासणी व उपचार केले.

**टी.सी. हरवली आहे**

**सरस्वती बालाजी पुपलवाड या** नावाची **भागीरथीबाई माध्यमिक विद्यालय, भोकर** जिल्हा नांदेड येथील ९ वी पासची टी. सी. **शिरुर ताजबंद ते अहमदपूर** प्रवासादरम्यान हरवली आहे.

सदरील टी.सी. कोणास सापडल्यास खालील मोबाईलवर संपर्क करावा.

मो. नंबर- ९३७३०३३४२३

**मनाचे सौंदर्य हेच खरे सौंदर्य**




अहमदपुरच्या वतीने आयोजित बौद्ध धम्म दिक्षा सोहळा संस्कार बुद्ध विहार, गायकवाड कॉलनी, अहमदपूर येथे संपन्न झाला. यावेळी सुनेगाव सांगवी येथील रहिवाशी असणारे सुरनर परिवाराने हिन्दू धर्माचा त्याग करुन बौद्ध धर्म स्वीकारला आहे.

**कागदपत्रे हरवली आहेत**

**नकुल दिलीप जाधव या** नावाची **रघुनाथराव मुंडे विद्यालय, कातकरवाडी तालुका आंबेजोगाई, जि. बीड** येथील १० वी पासची टी. सी., मार्क मेमो, सनद तसेच याच नावाची संत गाडगेबाबा कनिष्ठ महाविद्यालय, मार्तंडवाडी तालुका पालम, जिल्हा परभणी येथील १२ पासची टीसी व मार्क मेमो इत्यादी कागदपत्रे **अहमदपूर ते आंबेजोगाई** प्रवासादरम्यान हरवली आहे.

सदरील कागदपत्रे कोणास सापडल्यास खालील मोबाईलवर संपर्क करावा.

मो. नंबर- ९६३७६६४०२१

# अहमदपूर येथील हमीद सय्यद यांच्या घरी उत्तमराव वाघ यांनी दिली सदिच्छा भेट



अहमदपूर दि.१३(कारामुंगीकर) अहमदपूर येथील हमीद सय्यद यांच्या घरी उत्तमराव वाघ यांनी दिली सदिच्छा भेट दिली.

याबाबत अधिक माहिती अशी की, अहमदपूर चाकूर विधानसभेचे नेते तथा उत्तमराव वाघ प्रतिष्ठानचे संस्थापक उत्तमराव वाघ यांनी अहमदपूर येथील युवा कार्यकर्ता हमीद सय्यद यांच्या घरी आज सदिच्छा भेट दिली.

याप्रसंगी उत्तमराव वाघ यांचा हमीद सय्यद यांच्या कुटुंबीयांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी सलमा भाभी, मालनबी शेख, सलमा शेख, अन्सार भाई, इमाम शेख, ज्ञानेश्वर भोसले, ज्ञानेश्वर घोणसे आदीजण उपस्थित होते.

**मव्हळा सारखं जगूया**

बारा घरचे बारा आपुण
सारे एक होऊया
दाही दिशा हिंडून
मध गोळा करुया
एकत्रित राहून
दोस्त हो
मव्हळा सारखं जगूया
काट्या कुट्यात
झाडावरती
घरटं आपलं बांधून
कधी गोड बोलू
तर कधी घेऊ भांडून
हुलवायाला मातर आला कोणी
तर तुटून त्याच्यावर पडूया
एकत्रित राहून
दोस्त हो,
मव्हळा सारखं जगूया

**प्रा.डॉ. मारोती कसाब**
**मो.नं. ९८२२६१६८५३**

# कानेगावात विद्यार्थ्यांनी बनविले सीड बॉल

## कार्यशाळेत सेंद्रिय पद्धतीने केली बीजनिर्मिती



प्रशांत तांबोळकर

शिरूरआनंतपाळ : माती आणि शेण समप्रमाणात घेऊन एकजीव करण्यात आले. त्यात विविध देशी झाडांच्या बिया घालून छोट्या बॉलसारखे गोळे तयार करण्यात आले. माती, शेण आणि पाण्याचे मिश्रण केले... चिखलाचे गोळे करून त्यात विविध फळ बिया घातल्या... हाताने गोल आकार देऊन बनविले सीड बॉल..! शिरुर अनंतपाळ तालुक्यातील कानेगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत हा उपक्रम घेण्यात आला. गुरुमाऊली स्काऊट पथकाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदविला.कार्यशाळेत सहभागी झालेल्या पर्यावरणप्रेमींनी सीड बॉल बनविण्यासाठी लिंबोळ्या, चिंचोके, वड, आणि शेवग्याच्या बिया आणल्या होत्या.शाळेतील राज्य पुरस्कारप्राप्त शिक्षक सुशीलकुमार पांचाळ यांनी सीड बॉल बनविण्याचे प्रात्यक्षिक दाखविले.यावेळी हजारो सीड बॉल तयार करण्यात आले.वाळलेले सीड बॉल प्रवास,निसर्ग भ्रमंती, आणि सहलीदरम्यान टाकण्यात येणार आहेत. हे बॉल फुटून बियांना अंकुर येईल आणि त्या रोपांचे झाडात रुपांतर होईल अशी ही संकल्पना असल्याचे पांचाळ गुरुजींनी सांगितले व निसर्ग संवर्धनासाठी प्रत्येकाने कृतीशील होण्याचे आवाहन केले.यावेळी सह शिक्षीका राधाबाई येडले, प्रशांत जाधव,चंद्रसेन ढगे, गंगाधर बोरूळकर, शरद येडले, आदींची उपस्थिती होती.

# बीज प्रक्रिया उत्पन्नवाढीसाठी महत्त्वाचे : डॉ. विश्वनाथ कांबळे

## माझा एक दिवस माझ्या बळीराजासाठी उपक्रम

लातूर / प्रतिनिधी- कृषि महाविद्यालय लातूर व ग्रामपंचायत चिकलठाणा यांच्या संयुक्त विद्यमाने कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता तथा प्राचार्य डॉ. बाबासाहेब ठोंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली माझा एक दिवस माझ्या बळीराजासाठी हा उपक्रम मौजे चिकलठाणा येथे दि. १२.०६.२०२४ रोजी उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ०९.०० वाजता कै. वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. सदरील कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून चिकलठाणा चे उपसरपंच महेंद्र देशमुख तर प्रमुख पाहुणे म्हणून चंद्रकांत पाटील, बाबासाहेब देशमुख, नागेंद्र भारती, महेंद्र देशमुख, सुरेश इंगळे उपस्थित होते.

या कार्यक्रमाची प्रस्तावना डॉ. विश्वनाथ कांबळे प्राध्यापक तथा सह समन्वयक विस्तार शिक्षण यांनी करून उपस्थित शेतकऱ्यांसोबत सुसंवाद साधला व बीज प्रक्रिया बद्दल शेतकऱ्यांना माहिती दिली यामध्ये बायोमिक्स या जैविक खताचे बीज प्रक्रियेसाठी असलेले महत्त्व विषद केले. तसेच कृषि महाविद्यालय लातूर येथील ग्रामीण जागरूकता कार्यानुभव कार्यक्रमाचे कृषिदुत व कृषिकन्या यांनी बीज प्रक्रियेचे प्रात्यक्षिक करून दाखवले यावेळी अमित पवार, संपत इंगळे, भानुदास चमकुरे, चंद्रकांत वाकडे, उत्तम बनसोडे, मोतीराम पांचाळ, भाऊराव इंगळे इत्यादी शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विनोद शिंदे कार्यक्रमाधिकारी ग्रामीण जागरूकता कार्यानुभव कार्यक्रम यांनी केले तर सर्व पाहुण्यांचे आभार कृषिदुत वेदांत मोरे यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कृषिदुत व कृषिकन्या महेश कस्तुरी, प्रगती केसकर, परितोष कुलकर्णी, रविराज कुमावत, निकिता माने, श्रुतिका मंजारे, मीनाक्षी एस, सिद्धी अगाशे, प्रणिता धद्दू, पवन कदम, यांनी परिश्रम घेतले.

## मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

लातूर / प्रतिनिधी: राज्याच्या नवीन औद्योगिक धोरण-२०१९ अंतर्गत एक नाविन्यपुर्ण योजना व कार्यक्रम महाराष्ट्र शासनाने हाती घेतला आहे. यामध्ये स्थानिक पातळीवर व्यापक प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासाठी सूक्ष्म व लघु उपक्रमांचा चालना दिली जात आहे. याकरिता जिल्हा उद्योग केंद्राच्या माध्यमातून मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना राबविण्यात येत असून जात प्रवर्ग, उद्योग क्षेत्रानुसार अनुदान दिले जाणार आहे. तरी या योजनेचा जिल्ह्यातील युवक-युवतींनी लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक यांनी केले आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र अर्जदारांनी आवश्यक कागदपत्रांसह https://maha-cmegp.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करावेत. जिल्ह्यातील स्थानिक असलेले किमान १८ ते ४५ वयोगटातील स्वयंरोजगार करू इच्छिणारे उमेदवार, विशेष प्रवर्गासाठी (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास प्रवर्ग, महिला, दिव्यांग, माजी सैनिक) वयामध्ये ५ वर्षाची सवलत राहील. १० लाख रुपयावरील प्रकल्पासाठी किमान शैक्षणिक पात्रता ७ वी पास व २५ लाख रुपयावरील प्रकल्पासाठी किमान १० वी पास असणे आवश्यक आहे. अर्जदाराने यापूर्वी कोणत्याही अनुदान योजनेचा लाभ घेतलेला नसावा.

प्रक्रिया व निर्मिती प्रकल्पासाठी रुपये ५० लाख आणि सेवा व कृषीपूरक उद्योग प्रकल्पासाठी कमाल रुपये २० लाख प्रकल्प किंमत मर्यादा आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी जन्म दाखला, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, वयाचा पुरावा, शैक्षणिक पात्रतेसंबंधित कागदपत्रे, आधारकार्ड, पॅनकार्ड, जातीचे प्रमाणपत्र, फूड ऑन व्हील वाहतुकीसाठी परवानगी व वाहन चालविण्याचा परवाना, ग्रामीण भागासाठी लोकसंख्या प्रमाणपत्र, प्रकल्प अहवाल, फोटो इत्यादी कागदपत्रे आवश्यक आहेत, असे जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक यांनी कळविले आहे.

पान १ वरून

### पूर्ण क्षमतेने...

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी जम्मू-काश्मीरमधील सुरक्षा परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी बैठक घेतली. या बैठकीत नायब राज्यपाल मनोज सिन्हा, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल आणि इतर अधिकारीही सहभागी होते. यावेळी पंतप्रधानांना जम्मू-काश्मीरमधील परिस्थितीची माहिती देण्यात आली.

बैठकीदरम्यान, पंतप्रधान मोदींनी वरिष्ठ अधिका-यांना भारताची दहशतवादविरोधी क्षमता पूर्णपणे तैनात करण्याचे आवाहन केले. तसेच गृहमंत्री अमित शाह यांच्याशी सुरक्षा दल तैनात करण्याबाबत आणि दहशतवादविरोधी कारवायांबाबतही चर्चा केली. तसेच पंतप्रधान मोदींनी सुरक्षा यंत्रणा आणि इतर यंत्रणांना दहशतवाद्यांना पूर्ण क्षमतेने प्रत्युत्तर देण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. आपल्याकडे जी काही संसाधने उपलब्ध आहेत, ती दहशतवाद्यांशी सामना करण्यासाठी वापरली जावीत, असेही पंतप्रधानांनी सांगितले.

### सुनेत्रा

असे त्या म्हणाल्या. सुनेत्रा पवार पुढे म्हणाल्या, महायुतीच्या सर्व नेत्यांनी मिळून हा निर्णय घेतला आहे. छगन भुजबळ देखील फॉर्म भरायला होते त्यामुळे कोणीही नाराज नाही. लोकसभेवर जावे ही जनतेची मागणी होती तर राज्यसभेवर जावे अशी मागणी कार्यकर्त्यांची होती. सर्व कार्यकर्त्यांच्या मागणीनुसार राज्यसभेची उमेदवारी तुम्हीच घेतली पाहिजे असे पार्थ पवारांनी स्वत: सांगितले होते. त्यांचा देखील हा आग्रह होता असेही सुनेत्रा पवार म्हणाले. तर दुसरीकडे सुनेत्रा पवारांचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी महायुतीमधील एकही नेता उपस्थित न राहिल्याने महायुतीत अजित पवार एकटे पडले का? अशी चर्चा सध्या राजकीय वर्तुळात जोराने सुरु आहे. सुनेत्रा पवारांचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी केवळ राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते उपस्थित होते. यामुळे महायुतीत सारं काही आलबेल नसल्याची चर्चा सुरु आहे. राज्यसभेसाठी मंत्री छगन भुजबळ, बाबा सिद्दीकी, पार्थ पवार आणि आनंद परांजपे यांच्या नावांची चर्चा होती. मात्र सुनेत्रा पवारांची उमेदवारी निश्रि्चत करण्यात आली. यानंतर सुनेत्रा पवार यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला.

### एसटी महामंडळातील...

संबंधित कर्मचा-याला विनंती बदलीमध्ये तीन पर्याय देण्याची मुभा देण्यात आलेली आहे. कर्मचा-यांना समान न्याय देण्याबरोबरच महामंडळाच्या मनुष्यबळाचा क्षेत्रनिहाय समसमान वापर करण्यासाठी देखील हे ॲप उपयुक्त ठरणार आहे. लवकरच या संगणकीय ॲपव्दारे बदलीची प्रक्रीया सुरू करण्यात येणार आहे.

### लातुर काँग्रेस...

बाबत जिल्हाधीकारी यांना निवेदन दयावे, अशी सुचना काँग्रेस कमिटीला देण्यात आल्या. या अनुषंगाने लातूर लोकसभेचे खासदार शिवाजी बंडाप्पा काळगे यांच्या नेतृत्वाखाली लातुर काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर - घुगे यांना गुरूवार दि. १३ जून रोजी दुपारी निवेदन देण्यात आले.

यावेळी त्यांच्या सोबत लातुर जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्ष श्रीशैल उटगे, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्ष ड. किरण जाधव, प्रदेश सचिव अभय साळूंके, विलास कारखान्याचे व्हा. चेअरमन रविंद्र काळे, ॲड. बाबासाहेब गायकवाड, डॉ. अरविंद भाताब्रे, सुपर्ण जगताप, रमेश सुर्यवंशी, प्रविण सुर्यवंशी, इम्रान सय्यद, मारूती पांडे, प्रा. प्रविण कांबळे, प्रा. राजकूमार जाधव, ॲड. देविदास बोरुळे पाटील, ॲड. प्रविण पाटील, शिवाजी कांबळे, अभिजीत इगे, शरद देशमुख, मुकेश राजेमाने, राम स्वामी, सोनू डगवाले, प्रा.एम.पी. देशमुख, नागसेन कामेगावकर, सुलेखा कारेपूरकर, दत्ता सोमवंशी, अब्दूला शेख, असिफ बागवान, विजय टाकेकर आदी उपस्थित होते.

या निवेदनाव्दारे खरीप हंगाम सुरू झाला आहे. पाऊस वेळेवर पडल्याने सर्व शेतकरी पेरणीच्या तयारीत आहेत. लातूर जिल्हयातील पेरणीच्या प्रस्तावित क्षेत्रानुसार बियाणे आणि खते उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने सूक्ष्म नियोजन करावे. या काळात शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये यासाठी जिल्ह्यात बोगस बियाणे आणि खते विक्री होऊ नये यासाठी पथके स्थापन करून कारवाई करून फसवणूक होणार नाही याची काळजी घ्यावी. पेरणी हंगाम महत्वाचा असल्याने विविध पिकांच्या पेरणीची योग्य वेळ आणि पद्धत, रोग आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना याबद्दल माहिती देण्यासाठी कृषी विभागाने विशेष मोहिम राबवावी जेणे करून दुबार पेरणीचे संकट येणार नाही याची काळजी घ्यावी.

लातूर जिल्हयात गेल्या दोन तीन वर्षापासून अनेक गावात खरीप हंगामामध्ये सोयाबीन पिकावर शंखी गोगलगाय व इतर पिकावर पिवळा मोझ्ॅक आणि तूरीवरील मर रोग प्रादूर्भाव मोठया प्रमाणात होऊन शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. खरीपाची सुरू होत आहे, यासाठी सुरूवातीलाच संबंधित विभागाकडून संभाव्य उपायोजना करणे आवश्यक आहे.

गतवर्षी शेतामध्ये गोगलगायींचा प्रादुर्भाव हा जास्त दिसून आला व तो दिवसेंदिवस वाढत गेला. काही भागात पुर्ण शिवार गोगलगायींनी फस्त केले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना आंतरमशागत सोडून गोगलगायी वेचाव्या लागल्या. यातून अनेक शेतकऱ्यांसमोर दुबार पेरणीचे संकट उभे राहिले होते. ही स्थिती लक्षात घेऊन अशी वेळ यावर्षी येऊ नये यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात.

गतवर्षीच्या खरीप हंगामात सुरुवातीस अल्प पाऊस झाल्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणी केल्यानंतर पाऊसाने दिर्घकाळ उघाड दिली. यामुळे अनेक शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी लागली होती. यात खरीप पिकांचे नुकसान झाले. शासनाने नुकसान भरपाई आणि कंपनीने विमा देण्याचे जाहीर केले, मात्र शेतऱ्यांना नुकसान भरपाई मिळाली नाही. केवळ २५ टक्के विमा रक्कम मिळाली. तरी शेतऱ्यांना नुकसान भरपाई व उर्वरीत विमा रक्कम मिळावी आदी मागण्याचे निवेदन देण्यात आले आहे.

### जिल्हाधिकारी...

प्रारंभी लामजना येथील केशव शिवहार पाटील यांच्या शेतामध्ये जिल्हाधिकारी यांनी पेरणीची पाहणी केली. कृषि विभागाने केलेल्या मार्गदर्शनानुसार पेरणीपूर्वी बीजप्रक्रिया करण्यात येत असल्याचे शेतकऱ्यांनी यावेळी सांगितले. श्री. पाटील यांच्या शेतामध्ये रुंद वरंबा सरी पद्धतीने टोकन यंत्राच्या सहाय्याने तूर पिकाची पेरणी करण्यात आली. जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनीही पेरणीमध्ये सहभागी होत टोकन पद्धतीने पेरणी केली. तांबरवाडी येथील खंडू सूर्यवंशी यांच्या शेतात टोकन यंत्राद्वारे करण्यात येत असलेल्या तूर पेरणीचीही त्यांनी पाहणी केली. तसेच टोकन यंत्रामुळे होणारे फायदे शेतकऱ्यांकडून जाणून घेतले.

टोकन यंत्राच्या सहाय्याने पेरणी करण्यात येत असल्याने वेळेत, बियाणांची आणि श्रमाची बचत होत असल्याचे शेतकऱ्यांनी यावेळी सांगितले. कृषि विभागाने जास्तीत जास्त शेतकऱ्यांना टोकन यंत्र उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी यांनी यावेळी दिल्या.

बीबीएफ यंत्राच्या सहाय्याने खारोसा येथील शेतकरी बब्रुवान डोके यांच्या शेतात सुरु असलेल्या सोयाबीन पेरणीचीही जिल्हाधिकारी यांनी पाहणी केली. बीबीएफ यंत्राने पेरणी केल्यामुळे शेतकऱ्यांना होत असलेल्या फायद्याची माहिती तालुका कृषि अधिकारी यांनी यावेळी दिली. तसेच तालुक्यात बीबीएफ यंत्राद्वारे पेरणी करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या वाढत असल्याचे त्यांनी सांगितले. बीबीएम यंत्राद्वारे पेरणीचे महत्व शेतकऱ्यांना पटवून देवून यासाठी प्रोत्साहन देण्याच्या सूचना जिल्हाधिकारी यांनी दिल्या.

यावेळी बैलगाडीमध्ये बसून जिल्हाधिकारी ठाकूर-घुगे खारोसा येथीलच शेषराव मारुती राऊतराव यांच्या शेतात पोहोचल्या. बैलाच्या सहाय्याने पारंपारिक पद्धतीने करण्यात येत असलेल्या सोयाबीन पेरणीचीही जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी पाहणी केली. काही शेतकऱ्यांच्या बांधावर यावेळी जिल्हाधिकारी ठाकूर-घुगे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

औसा-रेणापूरचे उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आर. टी. जाधव, जिल्हा परिषदेचे कृषि विकास अधिकारी सुभाष चोले, उपविभागीय कृषी अधिकारी दिलीप जाधव यांच्यासह तहसीलदार, तालुका कृषि अधिकारी, संबंधित गावचे सरपंच, तलाठी, ग्रामसेवक, कृषि सहाय्यक यावेळी उपस्थित होते.


**CHANGE IN NAME**

I, GS-191051N OEM Gaikwad Sunil Dagadu serving In General Reserve Engineering Force (BRO) presently serving in 476 RMPL/91 RCC (GREF), PIN: 930 091, C/o 99 APO, father of the Pranav Sunil Gaikwad. I have changed the name of my minor son from PRANAV SUNIL GAIKWAD to GAIKWAD PRANAV SUNIL vide Affidavit Sil No. 99AA 229699 dated 10 Jun 2024. That both names PRANAV SUNIL GAIKWAD and GAIKWAD PRANAV SUNIL pertain to the same person.

**CHANGE IN NAME**

I, GS-191051N OEM Gaikwad Sunil Dagadu serving In General Reserve Engineering Force (BRO) presently serving in 476 RMPL/91 RCC (GREF), PIN: 930 091, C/o 99 APO, father of the Prachi Sunil Gaikwad. I have changed the name of my minor daughter from PRACHI SUNIL GAIKWAD TO GAIKWAD PRACHI SUNIL vide Affidavit Sil No. 99AA 229699 dated 10 Jun 2024. That both names PRAC SUNIL GAIKWAD and GAIKWAD PRACHI SUNIL pertain to the same person.

**टि.सी.हरवली आहे**

माझी पल्लवी बंडूआप्पा बिडवे या नावाची बि.एड. ची मुळ टि.सी. आणी मार्क मेमो,बि.एस.सी. फायनल चीमार्क मेमो ८/०६/२०२४ रोजी उदगीर ते लातूर प्रवासात हरवली आहे. कोणास सापडल्यास खालील मो.नं.वर संपर्क साधावा

मो.नं.९८८१३६४७१८

**टि.सी.हरवली आहे**

अभिजित रामदास भजले या नावाची १२ वी पासची मुळ टि.सी.दि.१५/०५/२०२४ रोजी अहमदपुर ते उदगीर प्रवासात हरवली आहे कोणास सापडल्यास खालील मो.नं.वर संपर्क साधावा

मो.नं.९०२२७०७७३४

**टि.सी.हरवली आहे**

अंकिता अंगद माने या नावाची १२ वी पासची मुळ टि.सी.दि.१५/०५/२०२४ रोजी उदगीर ते शिरुर बस प्रवासात हरवली आहे .कोणास सापडल्यास खालील मो.नं.वर संपर्क साधावा

मो.नं.८७६६४७९९१७

**टि.सी.हरवली आहे**

महेश देवराव या नावाची १२ वी विज्ञान पासची मुळ टि.सी.दि.१५/०५/२०२४ रोजी उदगीर ते निलंगा प्रवासात हरवली आहे कोणास सापडल्यास खालील मो.नं.वर संपर्क साधावा

मो.नं. ७९७५८०९५८०

**DECLARATION**

**CHANGE OF NAME**

I have changed my name from PATEL AAYESHA MOHD SAJID to PATEL AAYESHAFAYAZ. Hence for this declaration. And in future I will use my new name PATELAAYESHA FAYAZ. Also, in future the same name will be used by my family.

**Old Name**
PATEL AAYESHA MOHD SAJID
**New Name**
PATEL AAYESHA FAYAZ
**ADDRESS**
AMBAJOGAI ROAD, RIYAZ COLONY, LATUR – 413512

**PUBLIC DISCLOSURE**

**(NAME CHANGE)**

By this disclosure it is announced that my documentary name is. SHAIKH MOHAMMED RAFIK MASLODDIN.My other documentary name is , next i will use this SHAIKH RAFIK name is, SHAIKH MOHAMMED RAFIK MASLODDIN , in my pravite and legal practice. Relatives should note this.

**OLD NAME**
SHAIKH RAFIK
**NEW NAME**
SHAIKH MOHAMMED RAFIK MASLODDIN
**ADDRESS**
Aaqib Manzil Haji Sattar Khan Colony Near MG College Ahmadpur Dist Latur 413515

**PUBLIC DISCLOSURE**

**(NAME CHANGE)**

By this disclosure it is announced that my documentary name is. SHAIKH SANIYAFATEMA ASIF .My other documentary name is , next i will use this SHAIKH SANIYAFATEMA RAFIK name is, SHAIKH SANIYAFATEMA ASIF , in my pravite and legal practice. Relatives should note this.

**OLD NAME**
SHAIKH SANIYAFATEMA RAFIK
**NEW NAME**
SHAIKH SANIYAFATEMA ASIF
**ADDRESS**
Aaqib Manzil Haji Sattar Khan Colony Near MG College Ahmadpur Dist Latur 413515


**ग्रामपंचायत कार्यालय, श्याम नगर १२ नं. पाटी ता. जि. लातूर.**

**जाहिर प्रगटन**

मौजे श्याम नगर १२ नं. पाटी ता. जि. लातूर येथील सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, नामदेव अंबादास मुळे रा . अंकोली ता. जि. लातूर, ता. जि. लातूर यांची जागा / घर नोंदणी बाबतचा अर्ज व रजिस्ट्री नक्कल ग्रामपंचायतला दि. १३/६/२०२४ रोजी खतविण्यासाठी नावे करण्यासाठी प्राप्त झाले आहे.

रजि. क्र. ७५०/२०२४ दि.६.२.२०२४

सदर जागेची / घराची चुतःसिमा पुढील प्रमाणे आहे.

पु.– १५ फुट रूंदीचा रस्ता — प. मांजरा कारखान्याची जमीन

द.– प्लॉट नंबर ३६ — उ. १५ फूट रुंदीचा रस्ता

| गट. नं. | जागेची साईज | खरेदीदाराचे नाव | विक्रीदाराचे नाव |
|---|---|---|---|
| २९४ पैकी प्लॉट नं. ३७ | पु.प.१२ द.उ.११.५ एकूण क्षेत्रफळ १३८ | **नामदेव अंबादास मुळे** | **मारोती भिमराव खैरमोडे** |

किंमत २६,००० :– सदर आतील जागेची नोंद करण्याबाबत कोणाचा आक्षेप / विरोध असेल तर हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून (७) दिवसाच्या आत ग्रा. पं. लेखी तक्रार अर्ज करावा. मुदतीनंतर काही तक्रार आल्यास अशा तक्रारी अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरीत :–**
**ग्रामसेवक/सरपंच**


# कल्याण बाजार

| | | |
|---|---|---|
| १४९ | ४–६ | २६८ |
| २३९ | | ७९० |
| ४३–३४ | | ६८–८६ |

# मिलन नाईट बाजार

| | | |
|---|---|---|
| १४० | ५–७ | ११५ |
| २३० | | २२३ |
| ६८–८६ | | ७२–२७ |

गोल्डन विक्री चान्सेस

**प्रो. योगेश कुमार**
स्पेशल जोडी, सिंगल, पत्तीसाठी संपर्क साधावा.
संपर्क 99 93 94 16 69
98 98 20 38 88

# नशिबाची परिक्षा

गोल्डन विक्री चान्सेस

**मिलनम डे** (कल्याणम)

| उदय–अस्त | | सिंगल:९–५–७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 130 | ७–४ | 124 | जोड | 40-67-91-82-75 |
| 248 | | 467 | | |
| 220 | | 700 | | |

**कल्याणम**

| उदय–अस्त | | सिंगल:०–३–७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 127 | ४–० | 158 | जोड | 06-24-39-57-48 |
| 280 | | 680 | | |
| 460 | | 455 | | |

**मुंबैम (मेन)**

| उदय–अस्त | | सिंगल:७–१–४ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| १७९ | ०–७ | १४५ | जोड | 72-30-18-45-09 |
| २९८ | | २३५ | | |
| ३७७ | | ५५० | | |


संपर्क 99 75 47 98 26


हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे,** संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे ईमेल** : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com

लोकमान्य अर्बन क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि. उदगीर
नगरपरिषद, उदगीर जि. लातूर संस्थेच्या विविध ठेवी योजना

| कालावधी | व्याजदर |
|---|---|
| ३० ते ४५ दिवस- | ५.५०% |
| ४६ ते १८० दिवस | ७.५०% |
| १८१ ते ३६५ दिवस | ८.५०% |
| १२ महिने ते २४ महिने | ९.७५ % |
| २४ महिने ते ३६ महिने | १०.५०% |
| ३६ महिने ते ६० महिने | ११% |
| लोकमान्य मासीक व्याज प्राप्ती ठेव योजना | १०% |

**९% आवर्त ठेव द.सा.द.शे,** ०.५०% अधिक व्याजदर जेष्ठ नागरीक व महिला, दाम दुप्पट, ७८ महिने, वैयक्तिक कर्ज व इतर कर्ज १६%, सोने तारण कर्ज १४%, वेअर हाऊस कर्ज १६%, वरिल सर्व ठेवीवर नियम व अटी लागु.



# यशवंत

शुक्रवार दि. १४ जून २०२४

# उदगीर

पान ४

कार्यालय :०२३८५-२५३११८ मो.९८५०२२८२४०

email - yashudgirram@gmail.com

बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.
शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)
दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

उपलब्ध सुविधा
वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमएस बँकींग, मोबाईल बँकींग

# दैनंदिन उपजीविका भागविण्यासाठी शेतमजुरीला गेली अन् काळाचा घाला!

## मोलमजूरदारीसाठी शेतात गेली असताना अचानक वीज पडून दुर्दैवी मृत्यू झाला



जळकोट (प्रतिनिधी)- जन्मापासूनच ते मृत्यूपर्यंत घर संसारातील दैनंदिन दळणवळण सह उपजीविका भागविण्यासाठी व पोटाची खळगी भरण्यासाठी तसेच घरातील अठरा विश्र्व दारिद्र्य तुन कष्टाने, परिश्रमपूर्वक व मेहनतीने मोलमजुरी करीत आपली उपजीविका भागविण्यासाठी दैनंदिन मोलमजुरी करण्यासाठी शेतकऱ्यांच्या शेतात धसकट वेचणी, कडबा, केरकचरा वेचणी व झाडांचा पाला पाचोळा, काळयामातीरानात वेचणी करण्यासाठी गेलेल्या अतनूर-गव्हाण येथील महादाबाई गणेश उडते रा.गव्हाण ता.जळकोट या महिलेचा मृगाच्या नक्षत्रात आभाळातून कोसळणाऱ्या मुसळधार पाऊस व विजेच्या गडगडाटासह, कडकडाटासह पडणाऱ्या विजेने झाडाखाली थांबलेल्या महिलेच्या अंगावर वीज पडून दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना गुरुवारी (दि.१३ ) रोजी अंदाजे दुपार नंतर ४ वाजण्याच्या सुमारास अतनूर-गव्हाण-बाराहाळी मार्गावरील गव्हाण गावातील रामहनुमान, महादेव मंदिराजवळील शेतात घडली.

पोलिस पाटील रावसाहेब जाधव-पाटील, अतनूर-गव्हाण सज्जाचे तलाठी अतिक शेख यांनी याबाबत दिलेल्या अधिक माहितीनुसार महादाबाई गणेश उडते (वय ५५, रा. गव्हाण ता.जळकोट ) ह्या मोलमजूरदार म्हणून गावातील एका शेतकरी यांच्या शेतात कामे सुरू असल्याने महिला मजूर म्हणून गावातील ईतर महिलांसोबत त्यापण मजुरीवर शेतात गेल्या होत्या. महादाबाई गणेश उडते हयासुद्धा त्याचा समवेत शेतात गेली होती. वातावरण ढगाळ होते मात्र सकाळपासूनच पावसाने उघडीप दिली होती. दुपारनंतर सायंकाळी चार वाजण्याच्या सुमारास अचानक जोरदार वाऱ्यासह विजा चमकण्यास सुरुवात झाली. काही कळण्याच्या आत एक जोरदार आवाज होऊन वीज महादाबाई हिच्या अंगावर पडली. ही वार्ता कुटुंबीयांनी मिळाली. पण त्या जागेवरच गतप्राण झाल्या होत्या. आपला दैनंदिन घर प्रपंच संसार चालावा याकरिता त्या मोलमजुरी करीत असत. आज शेतात गेली असताना अचानक वीज पडून दुर्दैवी मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

या घटनेनंतर जळकोटच्या कर्तव्यदक्ष तहसीलदार सौ. सुरेखा स्वामी, जळकोट पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रदीप काकडे व बीट अंमलदार श्रीधर गुडाप्पे, अतनूर-गव्हाण सज्जा चे तलाठी अतिक शेख यांना देण्यात आली आहे. महादाबाई उडते यांच्या पश्र्चात पती, ३ मुले, १ मुलगी, सून, नातवंडे असा परिवार आहे. विशेष म्हणजे त्यांच्या पश्र्चात गणेश भीमराव उडते हे वय ७० वर्षांचे वयोवृद्ध असून त्यांची येणाऱ्या काळात दैनंदिन उपजीविका, आरोग्यांच्या विविध निर्माण होणाऱ्या समस्यांना ते कशाप्रकारे तोंड देतील त्याबद्दलही हःळहळ व्यक्त होत आहे. केंद्र व राज्य सरकारने, महाराष्ट्र राज्य सरकारने, महसूल प्रशासनाने तसेच आपत्ती व्यवस्थापन विभागाने त्यांना त्वरित आर्थिक मदत द्यावी व गणेश भिमराव उडते यांना वयोवृद्ध, ज्येष्ठ नागरिक योजना चा जळकोटच्या कर्तव्यदक्ष तहसीलदार सौ.सुरेखा स्वामी यांनी विनाअट त्यांचा अर्ज मंजूर करून महिन्याकाठी मिळणारे आर्थिक सहाय्य अनुदान त्वरित द्यावे. अशी मागणी अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या महिला आघाडीच्या लातूर जिल्हाअध्यक्षा तथा लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या माजी चेअरमन, माजी जिल्हापरिषद सदस्या शीलाताई अजितराव पाटील गव्हाणकर, जळकोट कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक आशिष पाटील राजूरकर गव्हाणकर, ग्राहक पंचायत महाराष्ट्र राज्याचे जिल्हा संघटक तथा ग्राहक संरक्षण परिषदेचे शासननियुक्त अशासकीय सदस्य बी.जी. शिंदे-पाटील अतनूरकर, गव्हाण ता.जळकोटचे सरपंच बालाजी गुडसुरे, अतनूरचे सरपंच चंद्रशेखर पाटील, यांनी जिल्हाधिकारी वर्षाताई ठाकूर-घुगे यांच्याकडे केली आहे.

# उत्सवप्रियतेला कायदा आणि सुव्यवस्थित जोड द्या:जिल्हा पोलिस अधिक्षक सोमय मुंढे



उदगीर (प्रतिनिधी) : उदगीर शहर हे उत्सवप्रिय शहर म्हणून ओळखले जाते. येऊ घातलेल्या बकरी ईदचा सण देखील आनंदात आणि शांततेत साजरा करा. आपल्या उत्सवप्रियतेला कायदा आणि सुव्यवस्थित जोड द्या. असे आवाहन लातूर जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी केले.

ते उदगीर येथील रघुकुल मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या बकरी ईद च्या अनुषंगाने शांतता कमिटीच्या बैठकीत मार्गदर्शन करताना बोलत होते. याप्रसंगी उदगीर शहरातील धर्मगुरू, प्रतिष्ठित व्यक्ती, पोलीस पाटील, शांतता समितीचे सदस्य यांच्यासोबतच उदगीर उपविभागाचे अधिकारी सुशांत शिंदे, उपविभागीय पोलीस अधिकारी सोहेल शेख, तहसीलदार राम बोरगावकर, नगर परिषदेचे मुख्याधिकारी सुंदर बोंदर, गटविकास अधिकारी प्रवीण सुराडकर, उदगीर शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक करण सोनकवडे, ग्रामीणचे पोलिस निरीक्षक अरविंद पवार, माजी नगराध्यक्ष राजेश्र्वर निट्रे, मौलाना रफीयोद्दीन फारुकी, अजिज रहमान, झाकीर अत्तार इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

# एकूण १६ लाख ९ हजार ८४० रुपयांची वीज चोरी

उदगीर/प्रतिनिधी- उदगीर: शहरातील बिदर रोड, माळेवाडी रोड, भागात वीज वापरदाराने २२ ऑगस्ट २०२३,९ ऑक्टोबर २०२३,२० डिसेंबर २०२३ व २९ जानेवारी २०२४ रोजी एकूण १ लाख ६ हजार २६१ युनिटची वीज चोरी केल्याचा प्रकार उघडकीस आला, याप्रकरणी उदगीर शहर पोलीस ठाण्यात १२ जून रोज बुधवारी रात्री १० वाजेच्या सुमारास सहा लोकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस सुत्राकडून समजलेली माहिती अशी की बिदर रोड, माळेवाडी रोड भागात वीज वापरदार आरोपीने वीज चोरी केल्याचा प्रकार उघडकीस आला, आरोपीने १ लाख ६ हजार २६१ युनिटची वीज चोरी करून महाराष्ट्र राज्य विद्युत महावितरण कंपनीची १६ लाख ९ हजार ८४० रुपयांची वीज चोरी केली व तडजोड अंती ५ लाख ३५ हजार रुपयांचे नुकसान केले, आरोपींना वीज चोरी व तडजोड रक्कमेचे बिल दिले असता त्यांनी ते बिल दिलेल्या मुदतीत भरणा न केल्यामुळे तुकाराम गोरोबा वडवळे सहायक अभियंता महावितरण शाखा गंजगोलाई लातूर यांच्या फिर्यादीवरून आरोपी शमशोद्दीन रहीमोद्दीन शेख, किसन यशवंतराव बिरादार,

दत्तात्रय दिगंबर बिरादार, राहुल मधुकर तेलंगे, रशिदा बशीरसाब शेख व शफिर बशीरसाब शेख यांच्यावर उदगीर शहर पोलीस ठाण्यात गुरंन १५६,१५७,१५८,१५९,१६०/२४ कलम १३५ भारतीय विद्युत कायदा २००३ नुसार १२ जून रोज बुधवारी रात्री १० वाजता गुन्हा दाखल करण्यात आला आहे, अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक पाटील हे करीत आहेत,

# शाळेत जाणारा रस्ता प्रश्न सोडवा विद्यार्थीनीची मागणी

उदगीर / प्रतिनिधी

देशभरात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करण्यात येत आहे. विकासाची विविध कामे करण्यात येत आहेत. पण, अजूनही ग्रामीण भागातील अनेक गावे, वस्त्या मुलभूत सुविधांपासून दुर आहेत. विशेष म्हणजे उदगीर जळकोट लोकसभा मतदारसंघातील तसेच उदगीर जिल्हा नवनियुक्त होण्यासाठी चौरस भागातील क्षेत्र असतानाही व उदगीर शहरातील प्रभाग क्रमांक तीन दोन मधील व नगरपरिषद उदगीरच्या हाकेच्या अंतरावर असलेल्या उदगीर जळकोट राष्ट्रीय महामार्गावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या चौकांपासून काही अंतरावर वसलेल्या भगीरथ राजा नगर कादरी फंक्शन हॉलच्या पाठीमागील भगीरथ राजा वस्तीत गेल्या पंचवीस तीस वर्षांपासून तेथील एक हजार लोक वस्ती असलेल्या वस्तीत व तेथील कमलेश्र्वर कन्या प्राथमिक व माध्यमिक शाळा, आजूबाजूला शासकीय, निम शासकीय, वस्तीगृह व शासनमान्य वस्तीगृह, बालगृह, बाल सदन, बालिकाश्रम, बाल संगोपन व धन्वंतरी आयुर्वेदिक कॉलेज कडे जाण्यासाठी जवळचा मार्ग असलेला रस्ता आजही चिखलमय असून याकडे या मतदारसंघाचे लोकप्रिय लोकनेते व उदगीर जळकोट मतदार संघात करिता २५०० कोटी रुपयांचा निधी मतदार संघातील रस्ते, नाली, पेव्हर ब्लॉक, इमारत बांधकाम, जलसंधारण, पाणीपुरवठा याकरिता आणल्याचा डिंगोरा पेटवणारे राज्याचे जबाबदार क्रीडामंत्री संजय बनसोडे यांच्याच उदगीर शहरा लगत असलेल्या भगीरथ राजानगर चे असे भयव्यय व विदारक चित्र हे महाराष्ट्राच्या नकाशावर आजरोजी पाहता येईल असे आहे. येत्या शैक्षणिक वर्षांपासून लहान बालके, विद्यार्थी, विद्यार्थिनींना कमलेश्र्वर कन्या प्राथमिक व माध्यमिक शाळेत जाण्यासाठी इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत याच चिखलमय रस्त्यावरून गुडघ्यावर चिखलातून पायपीट करीत आहेत. विशेष बाब येथे गोरगरीब, पददलित, आठरापगड जाती धर्मातील, अल्पसंख्याक मुस्लिम समाजातील, बौद्ध, कष्टकरी, हमाल, मापाडीसह



ख्रिश्र्चन मुस्लिम, मराठा, लिंगायत, गवंडी, वंजारी, बांधकाम कामगार मजूरदार, बंजारा समाजातील पहिली ते दहावीपर्यंतचे विद्यार्थी मोफत शिक्षण घेऊन चांगल्या गुणांनी बोर्डाच्या परीक्षेत उत्तीर्ण होतात. ही एकमेव शाळा अशी आहे की, या शाळेतून अनेक विद्यार्थ्यांचे भले झाले आहेत. या शाळेतून पहिली ते दहावीपर्यंत शिक्षण घेणारे विद्यार्थी आज कुठे शिक्षक, क्लार्क, लिपिक, सेवक, वर्ग दोन चे अधिकारी, अ, ब, क, ड चे लिपिक वर्गीय अधिकारी आहेत. हे विशेष होय. असे असतानाही या भगीरथ राजाची रस्ते, नाली अभावी प्रचंड हेळसांड होत आहे.

या प्रभागात या भगीरथ राजा नगर मध्ये जाण्यासाठी या रस्त्यांवरून व चिखलमय रस्त्यावरून धड चालताही येत नाहीये. एखादी गंभीर रुग्ण असेल त्याला हॉस्पिटलला घेऊन जाणे म्हणजे खाटेवर किवा चौघांच्या खांद्यावर बाजेवरच न्यावे लागते. हे पण विशेष आहे. कच्चा व पक्का सिमेंट रस्ता नसल्याने आवागमनास अडथळे निर्माण होतात. पावसाळ्यात तर संपर्कच तुटतो. अशीच परिस्थिती भगीरथ राजानगर, अलअमीन नगर, रमामाता आंबेडकर नगर, मौलाना आझाद नगर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकातील तळवेस, बौद्ध, दिन-दलित, पददलित, अठरापगड जातीजमातीतील व वडार समाज गल्ली, दलित वस्ती, मनियार बिल्डिंग पाठीमागील अल्पसंख्याक बहुबल मुस्लिम समाजातील वस्ती, येथील वार्ड प्रभाग भागात आहे. शहरातील हॉस्पिटलात जाण्यासाठी धड रस्ता नाही आणि पक्का रस्ताही नाही. त्यामुळे पावसाळ्याच्या कालावधीत येथील विद्यार्थी शाळेत जाण्यापासून वंचित राहतात. त्यात त्यांचे शैक्षणिक नुकसान होते. तसेच आरोग्यविषय समस्यांनाही सामोरे जावे लागते. प्रकृती बिघडल्यास तातडीच्या प्रसंगी रुग्णालयात नेताना अडचणी येत असून शासन, प्रशासनाने याकडे लक्ष देत ही समस्या सोडविण्याची गरज आहे.

उदगीर नगरपरिषद हद्दीत शहरातील उदगीर-जळकोट मुख्य मार्गावरील भगीरथ राजानगर वॉर्डमध्ये २/३ प्रभागात समावेश आहे. नगर परिषद पासून हाकके पर्यंतचे अंतर साधारण ५०० किलोमीटरचे आहे. येथील लोकसंख्या हजारांच्या वर आहे. भगीरथ राजानगर वासीयांना दैनंदिन, मोलमजुरदारी कामकाजाकरिता दैनंदिन कामकाज येथूनच आवागमन करावे लागते. शहराला व गावाला जोडणारा दुसरा रस्ता नाहीच. याच्या पुढे गेल्यानंतर पिंपरी व आवलकोंडा मानमोडी व ओढा, नदी नाल्या असून पलिकडे लातूर-नांदेड जिल्हा आहे. दोन किलोमीटरच्या अंतरात दोन नाले आहेत. दोन्ही नाल्यांना पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी असते. रस्ता तर नावालाही नाहीच. कच्च्या ओबडधोबड रस्त्याने आवागमन करताना सर्वांनाच त्रास सहन करावा लागतो. पायदळ चालणेही येथे कठीण ठरते. दळण, किराणा, शाळा, कॉलेज, जीवनावश्यक वस्तू खरेदीसाठी शहरातील मुख्य मार्ग येथे येण्याशिवाय पर्याय नाही. कुठल्या गावाला जायचे असले तरीही मुख्य मार्गाला यावे लागते. पण, ५०० किलोमीटरच्या अंतरात पक्का रस्ता नाही. नाल्या, सिमेंट रोड नाही. त्यामुळे सर्वांचीच अडचण होते. पावसाळ्यात तर या अडचणीत भर पडते. येथील नाल्या, सिमेंट रोड पुलाची निर्मिती करत रस्त्याचे बांधकाम करावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

पावसाळ्यात येथील परिस्थिती बिकट असते. नाल्याला मोठ्या प्रमाणात पाणी असते. त्यामुळे पावसाळ्याच्या कालावधीत येथील विद्यार्थी शाळेत जावू शकत नाहीत. या कालावधीत मुलांना शाळेत पाठवण्याची कुणी हिंमतही करू शकत नाही. येथील ४५ ते १७० विद्यार्थी येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत, कमलेश्र्वर प्राथमिक व माध्यमिक शाळेत प्रवेशित आहेत. काही विद्यार्थी माध्यमिक शाळेत तर काही शहरात कॉलेजला प्रवेशित आहेत. पावसाळयात येथील विद्यार्थी शाळा, कॉलेजला जाऊ शकत नसल्यान शैक्षणिक नुकसान होते.

# शिक्षण महर्षी बापूसाहेब राठोड यांचा वाढदिवस विविध उपक्रमाने मोठ्या उत्साहात साजरा




उदगीर:- गुणाई शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा भारतीय जनता पार्टी ग्रामीणचे लातुर जिल्हा सरचिटणीस बापूसाहेब राठोड यांचा वाढदिवस दिनांक ११ जून २०२४ रोजी जीएसपीएम कॅम्पस ,उदगीर येथे विविध उपक्रमाने मोठ्या उत्साहात संस्थेचे सचिव अमित राठोड, सहसचिव विजय राठोड, कोषाध्यक्ष दिगांबर राठोड, सदस्य रोहित राठोड यांच्या उपस्थिती मध्ये साजरा करण्यात आला. प्रतिवर्षी बापूसाहेब राठोड यांच्या वाढदिवसानिमित्त जी.एस.पी. एम संस्थेतील राजीव गांधी तंत्रनिकेतन उदगीर, एस आर इन्स्टिट्यूट ऑफ डिप्लोमा इन फार्मसी उदगीर, राजीव गांधी औद्योगिक प्रशिक्षण संस्था उदगीर, बिर्ला ओपन माईंड्स इंटरनॅशनल स्कूल उदगीर व शंकर माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा उदगीर यांच्या संयुक्त वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते यावर्षीही वृक्षारोपन, भव्य रक्तदान शिबीर याचे आयोजन करण्यात आले होते. रक्तदान शिबीरास संस्थेतील कर्मचारी व विदयार्थ्यी यांनी मोठया संख्येने सहभागी होऊन रक्तदान केले. यावेळी वरील सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

तसेच बापूसाहेब राठोड यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यासाठी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष राहुल केंद्रे, भाजपा प्रदेश सचिव देविदास राठोड, भाजपा अ.जा.मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष बालाजी गवारे, रामेश्र्वर बद्दर, माजी नगरसेवक शहाजी पाटील तळेगावकर, माजी नगरसेवक समिर शेख, कुणाल बागबंदे, माजी नगरसेवक गणेश गायकवाड, रामदास बेंबडे, उदयसिंह ठाकूर, ॲड सागर बिरादार, संजय पाटील मलकापूरकर, उत्तम कारभारी तसेच निडेबन जिल्हा परिषद गटातील सर्व गावचे सरपंच व निडेबनचे ग्रा.प.सदस्य रणजीत पाटील, चांदेगावचे सरपंच पंकज मुसने, जानापूरचे सरपंच कल्याण बिरादार, , लिंबगावचे सरपंच प्रशांत चामे, विनायक सूर्यवंशी, धडकनाळचे सरपंच बालाजी परकड, चोंडीचे सरपंच पाटील, शिरोळचे सरपंच केशव सगर, मदन पाटील, रामदास काळगापुरे , तोंडचीर येथील प्रदीप जाधव, अंकुश ताटपल्ले, , कुमदाळचे सरपंच रामदास ऐनिले, मादलापूरचे ग्रामपंचायत सदस्य बालाजी बनसोडे, राजेश्र्वर पाटील, सुनील जाधव, बामणी येथील संतोष कारभारी, मल्लापूर येथील भगवान आडे, बाबुराव राठोड, शिवाजी राठोड, कृष्णा आडे, मंचा तांडा येथील श्रयाम राठोड गुरूजी, देवर्जन येथील संतोष रोडगे, गायमाळ तांडा येथील तानाजी राठोड, सामाजिक कार्यकर्ते सतिश पाटील, बाबासाहेब सूर्यवंशी, राजकुमार सोमवंशी, मारोती पाटील यांच्यासह अनेक गावचे ग्राम पंचायत सदस्य, ग्रामसेवक, विविध वर्तपत्राचे पत्रकार , सामाजिक कार्यकर्ते , डॉक्टर्स , प्रतिष्ठित व्यक्ती, शैक्षणिक संस्थांचे संस्थाचालक, राजकीय नेते यांनी प्रत्यक्ष भेटून, फोनव्दारे व विविध माध्यमांचा साह्याने वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या .



# ना. आठवले हे तिसऱ्यांदा केंद्रीय मंत्री झाल्याबद्दल आरपीआय च्या वतीने जल्लोष

जळकोट : प्रतिनिधी- रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष ना. रामदास आठवले यांची सलग तिसऱ्यांदा केंद्रियमंत्री पदाची शपथ घेतल्यामुळे जळकोट तालुक्यातील सर्व कार्यकर्ते एकत्र येऊन घोषणा देत पेढे भरवून व फटाके वाजवून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

कोट : रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया पक्षाचे जळकोट तालुकाध्यक्ष विनोद कांबळे यांनी महाराष्ट्रातील बौद्ध समाज व जळकोट तालुक्यातील कार्यकर्ते खुश आहेत व गावोगावी मंत्रीपदाचा जल्लोष होत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी तीसऱ्यांदा मंत्रीपदाची शपथ घेतली व ना. रामदास आठवले यांना सलग तिसऱ्यांदा मंत्रीपदाची संधी दिल्याबद्दल रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया पक्षाचे कार्यकर्ते आभारी असल्याची प्रतिक्रिया दिली.

यावेळी रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडियाचे जळकोट ता .अध्यक्ष विनोद कांबळे, विलास राठोड युवा तालुकाध्यक्ष, उपाध्यक्ष बाळासाहेब कांबळे, सचिव अनिल काळे, जिल्हा उपाध्यक्ष दामोदर बोडके, माजी नगरसेवक अर्जून वाघमारे, प्रदिप कांबळे, मदार शेख, वसंत मोरे, कोंबडीबा सुर्यवंशी, तिरूपती सुर्यवंशी, माधव गायकवाड आदी उपस्थित होते.